Dusare Pushpa Samyak Jivandarshan 2019



# समताधिष्ठित समाजासाठी वास्तवतेला चिकित्सक जोड फुले-आंबेडकरांनी दिली - डॉ. राजू जाधव

महाड

हजारो वर्षापासून दाभिंक कर्मकांडात अडकलेल्या समाजरचनेसाठी वास्तव परिस्थितीचे चिकित्सक परीक्षण करून त्यामध्ये बदल करण्याची प्रेरणा क्रांतीसूर्य म. फुले, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिली, असे उद्‌गार डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात आयोजित समयक जीवनदर्शन महोत्सवाच्या दुसऱ्या पुष्पाप्रसंगी क्रांतिसिंह नाना पाटील अकडमी मुंबईचे अध्यक्ष अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. राजू जाधव यांनी काढले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी गुरव होते.

म. फुले डॉ. बाबासाहेब यांनी केवळ स्पृश्यांच्या मनुवादी वृत्तीवर टीका करीत बसण्याऐवजी समाजातील बहुसंख्य असणाऱ्या तळागाळातील या लोकांसाठी सांस्कृतिक संघर्ष मांडत त्यांच्या उन्नतीचा मूलमंत्र अस्तित्वात आणला. म. फुलेंनी भारतीय समाजातील जाती, प्रथा, रूढी, परंपरा यात परिवर्तन करण्यासाठी स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली केली म्हणूनच म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंत्या हया बहुजनांचा मुक्ति जागर असून या जयंत्या दिवशी जगात सर्वात जास्त पुस्तक विक्री होते याबद्दल गौरवोद्‌गार डॉ. जाधव यांनी काढले.

शितल वाहया सारख्या शेतकऱ्यांच्या मुलीची आत्महत्या हया प्रसंगांची चर्चा करीत डॉ. राजू जाधव यांनी भारतातील शेतकरी आत्महत्या का करतो वा तो अन्नदाता असूनही देशाधडीला का लागला आहे हयाची कारणमीमांसा करीत म. फुलेनी मांडलेल्या शेतकीशास्त्र संकलपनेची चर्चा करीत आजपासून १०० वर्षापूर्वी छ. शाहूंनी भरवलेल्या शेतकी मालाच्या प्रदर्शनाची कल्पना मांडली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महामानवांना केवळ विशिष्ट जातीत मर्यादित न ठेवता तयांचा वैश्विक दृष्टीकोन प्रत्येकाने ज्ञात करून घेतला पाहिजे ही काळाची गरज असल्याचे मत मांडले. विकासातील बदल केवळ मूठभर लोकांसाठीच मर्यादित न राहता त्यातून समता साधता आली पाहिजे तरच स्त्रियांवरील अत्याचार थांबतील म्हणूनच महामानव केवळ पूजेचे साधन न बनता त्यांच्या आचार विचारापासून प्रत्येकाने आदर्श घेतला पाहिजे. तरच महामानवांच्या जयंती साजरी करणाचे औचित्य साधले जाईल असे आवाहन तयांनी केले. १३ व्या वर्षी लेखन कार्य करणारी चिमुरडी मुक्ता यांनी जसा म. फुलेंपासून आदर्श घेतला व त्याप्रमाणे लाखो मुक्ता घडाव्याात व त्यांनी मुक्तीचा जागर पसरावा असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी गुरव यांनी महापुरूषांच्या विचारांची सांस्कृतिक चळवळ गतिशीलपणे पुढे चालवली पाहिजे असे आवाहन करीत सध्याच्या राजकारणाचे उपरोधिक शैलीत वाभाडे काढीत आपला पारंपारिक शत्रू जाती, धर्माचे राजकारण करीत आपणांस गुरफटत असून आपण सर्वांना अवघे विश्वच कुटूंबकम असा वैश्विक दृष्टीकोन बाळगत महापुरूषांच्या विचारांना केवळ अल्प समाजासाठी मर्यादित न बनवता त्याला सार्वत्रिक बनवा प्रसारमाध्यमे, टी.व्ही. सिरियल यांनी केवळ टी.आर.पी वाचविण्यासाठी मनोरंजकता न ठेवता महापुषांच्या, महामानवांच्या विचारांना प्राध्यान्य द्या की जेणेकरून त्याचा प्रचार घरोघरी होईल. म. फुले महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी, विचारांचा पुरस्कार सर्वांनी करून त्यांच्या विचारांचे नेतृत्व प्रत्येकाने करणे ही काळाची गरज आहे आज महाडसारख्या तालुक्यातील ग्रामीण भागातील बहुसंख्य व्यवसाय निमिताने स्थलांतर करीत असून शेती व्यवसाय बंद पडत आहे. त्यासाठी म. फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या शेतकी कल्पना आपण समजून घेतल्या तर हा पारंपारिक व्यवसाय बंद होणार नाही शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ स्तरावरील अभ्यासमंडळींनी यासाठी समतावादी श्रमिक शेती व्यवसाय निगडीत अभ्यासाची गोडी मुलांमध्ये र्मिाण करणे काळाची गरज असल्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. दीपक क्षीरसागर यांनी केले कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.